■ POSTEL REGD NO. AKOLA DN./285/2022-2024

साप्ताहिक

स्थापना : जुन २००८

# पिंगलाक्षी एक्सप्रेस



मुख्य संपादक : गजानन बानोरे 9420100590, 9075407343 R.N.I. No. MAHMAR/2008/24720

● रिसोड जि.वाशीम ● वर्ष १७ ● अंक ४५ ● मंगळवार, दि. २५ मार्च ते १ एप्रिल २०२५ ● पृष्ठे ४ ● किंमत १ रु

## शेतकऱ्यांनी केली स्वखर्चाने जलताराची उभारणी



### मंडळ अधिकारी लहाने यांचा पुढाकार

रिसोड : भविष्यात येणाऱ्या पाणीटंचाईवर उपाय म्हणून जिल्हाधिकारी भुवनेश्वरी एस , उपविभागीय अधिकारी वैशाली देवकर यांनी जलतारा हा महत्त्वाकांक्षी प्रकल्प वाशिम जिल्ह्यात राबवण्याचा निर्णय घेतला आहे त्याचाच एक भाग म्हणून तहसीलदार प्रतीक्षा तेजनकर यांच्या मार्गदर्शनाखाली वाकद येथील मंडळ अधिकारी ए व्ही लहाने व तलाठी जी जी गरकळ व तलाठी अक्षय जाधव यांनी मागील आठ दिवसापासून सतत पाठपुरावा करून वाकद येथील शेतकऱ्यांना स्वखर्चातून स्वयंस्फूर्तीने पुढे येऊन आपल्या शेतामध्ये जलतारा योजनाचा लाभ घेण्यासाठी तयार करून या शेतकऱ्यांच्या शेतात जलताराचे १० खड्डे तयार करण्यात आले.

यावेळी सुभाष पांडुरंग मोरे विलास पांडुरंग मोरे विपीन अनिल मोरे गिरीश विलास मोरे राहुल सुभाष मोरे आदी शेतकरी यांचे शेतात सदर जलतारा करण्यात आले मागील या प्रकल्पा अंतर्गत शेतकऱ्याना आपल्या शेतात एकूण एका एकरासाठी एक याप्रमाणे उताराच्या दिशेने शेतात ज्या ठिकाणी पाणी साचते अशा ठिकाणी पाच बाय पाच फूट लांबी रुंदी व सहा फूट खोली असलेले खड्डे खोदकाम करून त्यामध्ये मोठे मध्यम व छोट्या आकाराचे दगड भरून हे खड्डे भरून घ्यावे आणि त्यामुळे पावसाळयात पावसाचे वाहणारे व गाळ वाहून नेणारे पाणी अशा ठिकाणी थोपून ते जमिनीमध्ये जिरवले जाईल यामधून 'पाणी अडवा पाणी जिरवा' संकल्पना पूर्णत्वास जाईल 'जल है तो कल है' असे आपण म्हणतो परंतु खरे म्हणजे अशाप्रकारे ग्रामपातळीवर प्रत्यक्ष शेतकऱ्यांसोबत हात मिळवणी केल्याशिवाय शासनाची हे काम पूर्णत्वास जाणार नाही या योजनेमध्ये अल्पभूधारक शेतकऱ्यांना ज्यांच्याकडे जॉब कार्ड आहे किंवा जे इतर जॉब कार्ड धारकामार्फत काम करून घेऊ इच्छितात त्यांच्यासाठी जवळपास ५००० रुपयांपर्यंतचे अनुदान रोजगार हमी योजनेअंतर्गत देय आहे लाभ घ्यावा असे आवाहन महसूल विभाग करीत आहे. ता.प्र.

## 'समृद्धी' वरील प्रवास एप्रिलपासून महाग

### मुंबई ते नागपूर प्रवासासाठी १४४५ रुपये पथकर



**मुंबई :** मुंबई ते नागपूर समृद्धी महामार्गावरील प्रवास १ एप्रिलपासून महागणार आहे. महाराष्ट्र राज्य रस्तेविकास महामंडळाने (एमएसआरडीसी) समृद्धी महामार्गावरील पथकरात १९ टक्क्यांची वाढ केली. ही वाढ १ एप्रिलपासून लागू होणार आहे.

सध्या नागपूर ते इगतपुरी प्रवासासाठी हलक्या वाहनांना, चारचाकी वाहनांना १०८० रुपये पथकर मोजावा लागतो तेथे आता १ एप्रिलपासून १२९० रुपये पथकरापोटी खर्चावे लागणार आहेत.

#### नवे दर...

पथकरातील दरवाढीनुसार नागपूर ते इगतपुरी प्रवासासाठी हलक्या वाहनांना १०८० रुपयांऐवजी १२९० रुपये तर हलक्या व्यावसायिक, मिनी बससाठी १७४५ रुपयांऐवजी २०७५ रुपये पथकर भरावा लागेल. बस, दोन आसांच्या ट्रकसाठी ३६५५ रुपयांऐवजी ४३५५ रुपये आणि तीन आसांच्या व्यावसायिक वाहनांसाठी ३९९० रुपयांऐवजी ४७५० रुपये पथकर भरावा लागेल. अवजड बांधकाम यंत्रसामग्रीसाठी ५७४० रुपयांऐवजी आता ६८३० रुपये तर अतिअवजड वाहनांसाठी ६९८० रुपयांऐवजी ८३१५ रुपये पथकर भरावा लागेल. हे दर ३१ मार्च २०२८ पर्यंत लागू असतील.

#### मुंबई ते नागपूर प्रवासासाठी १४४५ रुपये पथकर

समृद्धी महामार्गातील शेवटचा इगतपुरी ते आमणे टप्पा पूर्ण झाला आहे. लोकार्पणाची प्रतीक्षा आहे. या टप्प्याचे लोकार्पण झाले की मुंबई ते नागपूर अंतर केवळ आठ तासांत पार करण्याचे स्वप्न पूर्ण होणार आहे. मात्र यासाठी वाहनांना १४४५ रुपये इतका पथकर मोजावा लागणार आहे.

### समग्र शिक्षा योजनेमार्फत ४,८६० शिक्षक पदांची लवकरच पदस्थापना

मुंबई, दि. २०: समग्र शिक्षा योजनेतंर्गत ४,८६० शिक्षक पदांच्या भरतीसंदर्भात शासन निर्णय निर्गमित झाला आहे. यात दिव्यांग विशेष शिक्षकांच्या २१८ पदांचाही समावेश आहे. त्यामुळे प्रत्यक्ष पदस्थापना येत्या दीड- दोन महिन्यात करण्यात येईल, अशी माहिती शालेय शिक्षण मंत्री दादा भुसे यांनी प्रश्नोत्तराच्या तासात दिली. या भरती प्रक्रियेसाठी शिक्षण संचालक यांच्या अध्यक्षतेखाली स्वतंत्र कक्ष स्थापन करण्यात आला आहे.

## संसदेत रेल्वे प्रकल्पासाठी खा.देशमुखांचा आवाज

### धार्मिक पर्यटन आणि रोजगाराच्या संधी होणार उपलब्ध.

**कारंजा** :यवतमाळ-वाशीम लोकसभा मतदारसंघाचे शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षाचे खा. संजय देशमुख यांनी लोकसभेत रेल्वेच्या मागण्यांवर चर्चा करताना मतदारसंघातील रखडलेल्या रेल्वे प्रकल्पांना गती देण्याची मागणी केली.



याबाबत खा. संजय देशमुख यांनी वर्धा-नांदेड, वाशीम पोहरादेवी-दिग्रस-माहूर-आदिलाबाद आणि मूर्तिजापूर-कारंजा-दारव्हा या रेल्वे मार्गांसाठी तातडीने कारवाई करण्याचा आग्रह धरला व वर्धा-नांदेड प्रकल्प केवळ ३८ कि.मी. चे पूर्ण झाल्याचे निदर्शनास आणून देत उर्वरित कामांची गती वाढवण्यासह वाशीम-पोहरादेवी-दिग्रस-माहूर रेल्वेमार्ग आणि वाशीम कारंजा-बडनेरा रेल्वे मार्गामुळे धार्मिक पर्यटन आणि रोजगाराच्या संधी वाढतील. त्यामुळे ऐतिहासिक मूर्तिजापूर-दारव्हा नेरोगेज मार्गाचे ब्रॉडगेजमध्ये रुपांतर करण्याची मागणी करीत यवतमाळ-वाशीम जिल्ह्याच्या आर्थिक विकासासाठी रेल्वे प्रकल्प महत्त्वाचा असल्याचे सांगून राज्य सरकारने या कामांसाठी तातडीने निधी मंजूर करावा आणि ऐतिहासिक 'शकुंतला एक्सप्रेस' पुन्हा सुरू करावी,अशी मागणी खा. देशमुख यांनी केली. ता.प्र.

## पंकज झा यांची अनंत नागरी सह पतसंस्थेला सदिच्छा भेट



रिसोड : एचडीएफसी बँकेचे डेप्युटी व्हाईस प्रेसिडेंट पंकज झा क्लस्टर हेड रिटेल ब्रांच बँकिंग नागपूर यांनी अनंत नागरी सहकारी पतसंस्थेला सदिच्छा भेट दिली यावेळी त्यांच्यासोबत रिसोड एचडीएफसी शाखेचे ब्रांच मॅनेजर बाजपेयी, असिस्टंट मॅनेजर गणेश शक्करवार यांची उपस्थिती होती . यावेळी अनंत नागरी पतसंस्थेचे संस्थापक अध्यक्ष तानाजीराव रंजवे यांनी पंकज झा यांचा शाल श्रीफळ व पुष्पगुच्छ देऊन सत्कार केला तसेच यावेळी ब्रांच मॅनेजर बाजपेयी व शक्करवार यांचाही शाल श्रीफळ व पुष्पगुच्छ देऊन सत्कार करण्यात आला याप्रसंगी पंकज झा यांनी पतसंस्थेचा वार्षिक अहवाल पाहून व पतसंस्थेचे कार्य पाहून कौतुक केले एचडीएफसी बँककडून पतसंस्थेस सर्व सुविधा देण्यात येईल असे त्यांनी यावेळी सांगितले याप्रसंगी पतसंस्थेचे उपाध्यक्ष डी के देशमुख सर, संचालक मोहनराव देशमुख, सरव्यवस्थापक गजानन जाधव, व्यवस्थापक बोरुडे व कर्मचारी उपस्थित होते या कार्यक्रमाचे संचालन व आभार प्रदर्शन सरव्यवस्थापक जाधव यांनी केले. (वि. प्र)

## संशयित क्षय रुग्णांची एक्सरे तपासणी



रिसोड : केंद्र शासनाच्या आरोग्य विभागामार्फत राष्ट्रीय क्षयरोग दुरीकरण कार्यक्रम अंतर्गत आज दिनांक २० मार्च रोजी तालुका रिसोड मधील प्राथमिक आरोग्य केंद्र मांगुळ झनक येथे फिरते डिजिटल क्ष -किरण वाहनाद्वारे संशयित क्षयरुग्नाचे एक्स रे तपासणी शिबिर घेण्यात आले.

१०० दिवस विशेष शोध मोहीम अंतर्गत १० मार्च ते २२ मार्च २०२५ पर्यंत सक्रिय मोहीम राबवली जात असून क्षयरुग्णांची तपासणी ही जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ ठोंबरे, जिल्हा शल्यचिकित्सक डॉ कावरखे, जिल्हा क्षयरोग अधिकारी डॉ पाटील, डॉ परभणकर . तालुका आरोग्य अधिकारी डॉ. रामहरी बेले, वैद्यकीय अधिकारी डॉ सोनल रूहाटीया, डॉ जय गायकवाड, डॉ मार्कड यांचे मार्गदर्शनाखाली देवेंद्र कलकोट, दिलीप चव्हाण, अशोक भगत, नारायण काळे, गरकळ, भगत, विठ्ठल बाजड, प्रमोद बावणे, रंजना गारडे, माधुरी देशमुख राजू झनक, गणेश राऊत, प्रशांत देशमुख, आशिष पिसे तसेच आशा कार्यकर्ती उपस्थित होते. सर्वाच्या सहकार्याने वैज्ञानिक अधिकारी वैभव रोडे यांनी १५१ संशयतांचे एक्स रे काढले तसेच १०५ संशयीतांचे स्पुटम गोळा करण्यात आले. लिंक वर्कर यांनी ६३ व्यक्तींची एड्स तपासणी केली असता ०१ रुग्ण पॉसिटीव्ह आढळून आला. शिबीराचे नियोजन रामदास गवई आरोग्य निरीक्षक जिल्हा क्षयरोग केंद्र वाशिम यांनी केले. सर्व उपस्थितांना क्षयरोग, एड्स बाबत आरोग्य शिक्षण देण्यात आले. श. प्र.


### साप्ता. पिंगलाक्षी एक्सप्रेस

– वृत्तपत्रासंबंधी माहिती –

फॉर्म नं. ४ (नियम ८ अन्वये)

| | | |
|---|---|---|
| १) प्रकाशनाचे स्थळ | - | कार्यालय साप्ता. पिंगलाक्षी एक्सप्रेस सिध्दी विनायक शिक्षक कॉलनी, मु.पो. ता. रिसोड जि. वाशीम |
| २) प्रकाशनाचा दिवस | - | मंगळवार (आठवड्यातुन एकदा) |
| ३) मुद्रकाचे नांव | - | राम उत्तमराव सालवणकर |
| राष्ट्रीयता | - | भारतीय |
| पत्ता | - | दिप प्रिंटर्स वारा जहां. ता.जि.वाशीम |
| ४) प्रकाशकाचे नांव | - | गजानन श्रीराम बानोरे |
| राष्ट्रीयता | - | भारतीय |
| पत्ता | - | सिध्दी विनायक शिक्षक कॉलनी, मु.पो. ता. रिसोड जि. वाशीम |
| ५) संपादकाचे नांव | - | गजानन श्रीराम बानोरे |
| राष्ट्रीयता | - | भारतीय |
| पत्ता | - | सिध्दी विनायक शिक्षक कॉलनी, मु.पो. ता. रिसोड जि. वाशीम |
| ६) मालकाचे नांव | - | गजानन श्रीराम बानोरे |
| राष्ट्रीयता | - | भारतीय |
| पत्ता | - | सिध्दी विनायक शिक्षक कॉलनी, मु.पो. ता. रिसोड जि. वाशीम |

मी गजानन श्रीराम बानोरे जाहीर करतो की, वरील सर्व तपशिल माझ्या माहितीप्रमाणे खरा आहे.

सही

२५ मार्च २०२५ गजानन श्रीराम बानोरे

रिसोड संपादक, प्रकाशक, मालक

## संपादकीय

# उष्माघात टाळा , आरोग्य सांभाळा

सध्या उन्हाळा सुरु झाला असून दिवसेंदिवस तापमानात वाढ होत आहे. भारतात हवामान खाते व राष्ट्रीय आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण यांच्या निकषानुसार मैदानी भागात ४० डिग्री अंश सेल्सीअस, डोंगराळ भागात ३० डिग्री अंश सेल्सीअसपेक्षा व समुद्र किनारी भागात ३७ अंश डिग्रीपेक्षा जास्त तापमान जात असल्यास त्यास उष्मलाट प्रवण क्षेत्र मानले जाते. उष्मा-लहर ही वातावरणीय तापमानाची स्थिती आहे. ज्यामुळे शारीरिक ताण येतो, ज्यामुळे कधीकधी मानवी जीवनावर अतिशय विपरीत परिणाम होत असतो. कोणत्याही ठिकाणचे कमाल तापमान सलग दोन दिवस ४५ अंश सेल्सिअसपेक्षा जास्त राहिल्यास त्याला उष्मा लहरी स्थिती म्हणतात.

वाढत्या तापमानामुळे उन्हात फिरणाऱ्या व्यक्तीला उष्माघात होण्याची शक्यता नाकारता येत नाही. त्यामुळे उष्णतेच्या लाटेपासून बचाव करण्यासाठी नागरिकांनी घ्यावयाची काळजी, उपाययोजना याची माहिती या लेखाच्या माध्यमातून जाणून घेण्यात येत आहे. हिंगोली जिल्ह्यामध्ये सध्या तापमानाचा पारा ३७ ते ३९ अंशापर्यंत पोहोचला आहे. कडाक्याच्या उन्हाळ्यात तापमानाचा पारा पुढील तीन महिने ४२ ते ४५ अंशांच्या घरात राहण्याची शक्यता नाकारता येत नाही. सध्या शेतीची कामे सुरू असून शेतमजूर आणि शेतकरी उन्हाची पर्वा न करता शेतात राबतात. त्यामुळे त्यांना उष्माघाताचा फटका बसण्याची सर्वाधिक शक्यता असते. त्यामुळे उष्माघाताचा लोकांना त्रास होऊ नये, यासाठी जिल्हा आरोग्य प्रशासनाने जिल्ह्यातील सर्व प्राथमिक आरोग्य केंद्रे, ग्रामीण रुग्णालये व उपजिल्हा रुग्णालयात स्वतंत्र उष्माघात कक्ष सुरू केले आहेत. उष्माघात कक्षात रुग्णांसाठी बेड, कुलर, थंड पाण्याची व्यवस्था, फॅन यासह औषधोपचारासाठी आवश्यक असलेली सर्व सामुग्री उपलब्ध करून देण्यात आली आहे.

उष्माघात होण्याची कारणे : शारीरिक श्रमाची, अंग मेहनतीचे व कष्टाची कामे करणे, कारखान्याच्या बॉयलर रुममध्ये काम करणे, काच कारखान्यात काम करणे, जास्त तापमानाच्या खोलीमध्ये काम करणे, घट्ट कपड्यांचा वापर करणे अशा प्रत्यक्ष उष्णतेशी अथवा तापमानातील वाढत्या परिस्थितीशी सतत संपर्क येण्याने उष्माघात होऊ शकतो. लक्षणे : मळमळ, उलटी, हात पायात गोळे येणे, थकवा येणे, ४० डिग्री सेल्सिअसपेक्षा जास्त ताप येणे, त्वचा गरम होणे व कोरडी पडणे, क्वचित लाल होणे, घाम न येणे, डि-हायड्रेशन, चक्कर येणे, निरुत्साही वाटणे, डोके दुखणे, छातीत धडधड होणे, रक्तदाब वाढणे, मानसिक अस्वस्थ, बेशुद्धवस्था इत्यादी लक्षणे आहेत.

# आसेगाव पेन येथे जलतारा योजनेच्या कार्यशाळेत मार्गदर्शन

▶ महासागर प्रतिनिधी ▶

**वाशीम**- रिसोड तालुक्यातील आसेगाव पेन येथे जिल्हाधिकारी यांच्या आदेशानुसार जलतारा योजना जिल्हाभर राबविण्याचे काम चालू झाले आहे. दरम्यान शासनाच्या शंभर दिवसाच्या कार्यक्रमांमध्ये जलतारा योजनेच्या संदर्भात गावांना भेटी देणे, मार्गदर्शन करणे व त्या बाबी प्रत्यक्षात अमलात आणणे या संदर्भात आसेगाव पेन येथील ग्रामपंचायतला भेट दिली . प्रथम सरपंच मनीषा खानझोडे यांनी उपविभागीय अधिकारी वैशाली देवकर यांचे शाल व पुष्पगुच्छ देऊन स्वागत केले. प्रमुख अतिथी नारायण आरु यांचे स्वागत संतोष खानझोडे यांनी केले.



गावातील शेतकरी, ग्रामपंचायत सदस्य यांना मार्गदर्शन करतांना उपविभागीय अधिकारी यांनी सांगितले की आपल्या गावातील संपूर्ण शेतकरी यांनी जलतारा योजनेची अंमलबजावणी केली तर सर्व गाव पाणीदार होईल. आपल्याला पाणी टंचाई पडणार नाही. आपल्या शेतीलाही १२ महिने पुरेल एवढा पाणीसाठा भूगर्भात राहील. जर आपण पावसाचे पाणी वाहून जाऊ दिले नाही आणी ते पाणी जमीनीत मुरवले तरच पाणीसाठा जास्त होईल. यासाठी सर्व शेतकऱ्यांनी या जलतारा योजनेच्या अंमलबजावणीसाठी सर्वांनी प्रयत्न करावे व अल्पभूधारक शेतकऱ्यांनी लाभ घ्यावा व जास्त जमीन धारकांनी ही योजना आपल्या शेतात फळ स्वयंस्फूर्तीने राबवावी त्यामुळे संपूर्ण गाव भविष्यातील पिढीसाठी प्रेरणादायी ठरेल व केव्हाच दुष्काळ पडणार नाही. असे आवाहन उपविभागीय अधिकारी वैशाली देवकर यांनी सर्व गावकऱ्यांना केले आहे. दरम्यान गावातील अंगणवाडी शाळेत भेटी दिल्या व जिल्हा परिषद शाळेत सुद्धा भेट देऊन गावातील छत्रपती शिवाजी महाराजांच्या पुतळ्याचे काम प्रगतीपथावर असल्याचे त्यांनी पाहणे दरम्यान सांगितले व छत्रपती हे आपले प्रेरणादायी आहेत.

आणी सर्व कामाचा आढावा घेतला व समाधान व्यक्त केले. या कार्यक्रमाला मंडळ अधिकारी पडवे, तलाठी कव्हर, तलाठी दुबे, कृषी सहाय्यक अनिल इंगोले, हनुमान आरु, ग्रामपंचायत अधिकारी दिलीप ठोकळ,गावच्या सरपंचा मनीषा खानझोडे, उपसरपंच अनिता कैलास खानझोडे, देविदास खानझोडे, देविदास थोरात, गंगुबाई खंडारे, किरण खानझोडे, लताबाई थोरात, वनमाला खानझोडे, विष्णु शिंदे, शशिकला इंगळे ,मधुकर रेखे, अर्जुनराव खानझोडे, संतोष खानझोडे, रविकांत तिखे, गजानन गुरुजी, अनिल खानझोडे, वैशाली विजय खानझोडे, शाळेचे मुख्याध्यापक वाघ, केंद्रप्रमुख काकडे, विश्वनाथ खानझोडे, ज्ञानेश्वर काळे , कोतवाल पोहकार उपस्थित होते. व आसेगाव पेन येथील शेतकरी विठ्ठल शिंदे व विष्णू चव्हाण यांच्या शेतात जलतारा योजनेचा खड्डा घेतला. यामध्ये उपविभागीय अधिकारी वैशाली देवकर यांच्या हस्ते पूजन करून त्यामध्ये दगड टाकण्यात आले. या कार्यक्रमाचे प्रास्ताविक मधुकर रेखे यांनी केले तर आभार विजय खानझोडे यांनी मानले.

# राष्ट्रीय लोक अदालतमध्ये यशस्वी तडजोड : न्यायालयीन प्रकरणांना दिलासा!

**वाशिम,दि.२२ मार्च (जिमाका ) राष्ट्रीय लोक अदालतच्या माध्यमातून वाशिम न्यायालयात प्रलंबित असलेल्या अनेक प्रकरणांचे यशस्वी निराकरण करण्यात आले. यामध्ये फौजदारी तसेच हिंदू विवाह कायद्यांतर्गत प्रलंबित असलेल्या प्रकरणांचा समावेश होता.**

फौजदारी प्रकरणात, अर्जदाराच्या वकिलांसह पॅनल सदस्य ॲड. एस. एस. कांबळे आणि ॲड. ए. डी. रेशवाल यांच्या प्रभावी समुपदेशनामुळे आईने मुलावर दाखल केलेले प्रकरण मागे घेण्याचा निर्णय घेतला. मुलाने आईला रुपये ५० हजार एकरकमी तसेच दरमहा ८ हजार रुपये देण्याचे मान्य केले. यानंतर मुख्य न्यायदंडाधिकारी प्र. र. राणे यांच्या उपस्थितीत पक्षकारांचा सत्कार करण्यात आला. असे मुख्य न्याय दंडाधिकारी प्र.र.राणे यांनी कळविले आहे.

हिंदू विवाह कायद्यांतर्गत प्रलंबित असलेल्या दोन प्रकरणांतही सकारात्मक निकाल लागला. ॲड. पी. ए. काबरा, ॲड. एस. के. लबडे आणि ॲड. पी. बी. फाटक यांच्या मार्गदर्शनाखाली दोन्ही पक्षकारांनी पुन्हा एकत्र येऊन संसार सुरू करण्याचा निर्णय घेतला.

या प्रसंगी प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश एस. व्ही. हांडे यांच्या हस्ते आणि जिल्हा विधी सेवा प्राधिकरणाचे सचिव व्ही. ए. टेकवाणी यांच्या उपस्थितीत दोन्ही पक्षकारांचा सत्कार करण्यात आला व त्यांना पुढील सुखी वैवाहिक जीवनासाठी शुभेच्छा देण्यात आल्या. असे सह दिवाणी न्यायाधीश वरिष्ठ स्तर जी.एम.चरणकर यांनी कळविले आहे

# अर्थसंकल्पीय अधिवेशनात शिक्षक आ.सरनाईक यांनी मांडले विविध प्रश्न

**वाशिम** : सध्या अर्थसंकल्पीय विधिमंडळ अधिवेशनाचा शेवटचा आठवडा आहे. या अधिवेशनामध्ये विधिमंडळाच्या दोन्ही सभागृहामध्ये महाराष्ट्र राज्यातील विविध प्रश्न उपस्थित झाले आहेत.

अमरावती विभागाचे शिक्षक आमदार किरणराव सरनाईक यांनी सुद्धा नेहमीप्रमाणे या अधिवेशनात शिक्षण विभागातील शक्य तेवढे प्रश्न उपस्थित करून शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना न्याय देण्याचा प्रयत्न केला आहे. विना अनुदानित व अंशतः अनुदानित शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांचा महत्त्वाचा मुद्दा म्हणजे १४ ऑक्टोबरच्या शासन निर्णयाची अंमलबजावणी करून अनुदान टप्पा वाढ देणे. यासाठी अधिवेशनात निधीची तरतूद न झाल्याने किरणराव सरनाईक यांनी सभागृहात लक्षवेधी सादर करून शासनाचे लक्ष वेधले व महाराष्ट्रात विनाअनुदानित व अंशतः अनुदानित शिक्षकांच्या होत असलेल्या आत्महत्या निदर्शनास आणून दिल्या. शासनाने यांचा अधिकअंतनपाहतातात्काळअनुदानटप्पा वाढ देण्याची विनंती त्यांनी केली. अर्थसंकल्पीय भाषणावर आपले मत



मांडताना शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांच्या समस्या, मराठी शाळांचे जतन करणे, शेतकऱ्यांच्या समस्या व शैक्षणिक क्षेत्रातील गुंतवणूक यावर त्यांनी प्रकाश टाकला. याशिवाय तारांकित प्रश्नांमध्ये सहावा व सातवा वेतन आयोग प्रलंबित हप्ते अदा करणे,विद्यापीठ व महाविद्यालयातील रिक्त प्राध्यापकांची पदे भरणे,नगरपालिका शाळेतील शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांची एनपीएस खाते उघडणे, तसेच सरसकट निवड श्रेणी देणे, अंशतः अनुदानित कर्मचाऱ्यांना वेतनेतन अनुदान तसेच वैद्यकीय प्रतिपुर्तीचा लाभ देणे, स्वयं अर्थ सहाय्यीत, विनाअनुदानित व अंशतः अनुदानित शाळांना विकास निधी उपलब्ध करून देणे,समाजकार्य महाविद्यालयातील प्रलंबित अनुदान वितरित करणे, त्यासोबतच सेवा प्रवेश नियमात बदल करणे इत्यादी महत्त्वाच्या विषयांवर सभागृहात प्रश्न मांडलेले आहेत.

शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांचा जिव्हाळ्याचा विषय म्हणजे जुनी पेन्शन योजना. यासंदर्भात एक नोव्हेंबर २००५ पूर्वीच्या कर्मचाऱ्यांना जुनी पेन्शन योजना लागू करणे, तसेच सध्या ही पेन्शन लागू न केल्यामुळे यातील सेवानिवृत्त कर्मचारी तसेच मयत कर्मचारी यांच्या कुटुंबाची झालेली बिकट अवस्था. यासाठी अर्थातास चर्चेद्वारे ही समस्या मांडण्याचा प्रयत्न केला. सुधारित पेन्शन योजनेची कार्यपद्धती विशद करणे, एक नोव्हेंबर दोन हजार पाच पूर्वी जाहिरात प्रकाशित झालेल्या व त्यानंतर नियुक्ती झालेल्या खाजगी अनुदानित शाळातील कर्मचाऱ्यांना जुनी पेन्शन लागू करणे इत्यादी समस्या त्यांनी मांडल्या. मागील कित्येक अधिवेशनात जास्तीत जास्त प्रश्न मांडण्याचा सरनाईक यांनी प्रयत्न केलेला आहे. तशीच अनुभूती या अधिवेशनात सुद्धा आलेली आहे. भविष्यातही शक्य तेवढ्या जास्तीत जास्त समस्यांसाठी पाठपुरावा करण्यासाठी आपण कटिबद्ध आहोत तसेच शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी आपल्या समस्या निदर्शनास आणून द्याव्यात असे आवाहनही त्यांनी अमरावती विभागीय शिक्षक संघाच्या वतीने केले आहे.

# रिसोड पोलीस स्टेशन परिसरात शांतता समितीची सभा



**रिसोड**, दि. २४ (प्रतिनिधी)

आगामी सण-उत्सवाना मोठ्या प्रमाणात प्रारंभ होणार असून या संदर्भात ठाणेदार रामेश्वर चव्हाण यांनी वाशीम जिल्हा पोलीस दल यांच्या आदेशानुसार नवीन कायदेविषयक कार्यशाळा तथा शांतता कमेटीची सभा रिसोड पोलिस स्टेशन परिसरात घेण्यात आली.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी ठाणेदार रामेश्वर चव्हाण होते. तर, प्रमुख मार्गदर्शक म्हणून तहसीलदार प्रतिक्षा तेजनकर, विजवितरणचे अभियंता जाधव, देवताळे, नगर परिषदेचे बरडे यांची उपस्थिती होती. कार्यक्रमाचे प्रास्ताविक पीएसआय अशोक गिते यांनी करीत आगामी सण उत्सवा दरम्यान कायद्याचे पालन करण्याचे आवाहन केले. यावेळी तहसीलदार तेजनकर यांनी मागील दोन वर्षातील तालुक्यातील सण, उत्सवातील शांततेची अनेक दाखले देत कोणताही धर्म चुकीची शिकवण देत नाही,असे मत व्यक्त केले. ठाणेदार चव्हाण यांनी नागरिकांना कायदा व सुव्यवस्था आबादीत ठेवण्याची जबाबदारी ही प्रत्येक नागरिकांची सुध्दा आहे. त्यामुळे सर्वांनी कायद्याचे पालन करावे, असे आवाहन केले. नगरपरिषदेचे बरडे यांनी शहराचे विद्रुपीकरण होईल, आशा प्रकारची बॅनर बाजी करू नका,किंवा कुठलेही काम रितसर परवानगी घेऊन करा, असे आवाहन केले.तसेच यावेळी बाळासाहेब खरात,बबनराव मोरे,नाझीर काजी, प्रा.रविंद्र अंभोरे, शहा फयजल यांनी विचार व्यक्त केले.कार्यक्रमाचे सुत्रसंचालन काशीनाथ कोकाटे यांनी केले. तर, सुरेश येरमुले यांनी आभार मानले. यावेळी दक्षता समिती सदस्य, पोलिस पाटील, तंटामुक्त समिती अध्यक्ष, व्यापारी, सामाजिक कार्येकर्ते, ज्येष्ठ नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

पिंगलाक्षी एक्सप्रेस (मराठी साप्ताहिक ) I R.N.I. No. MAHMAR/2008/24720

हे पत्र मालक, प्रकाशक, संपादक गजानन श्रीराम बानोरे यांनी दिप प्रिंटर्स (मुद्रक - राम उत्तमराव सालवणकर) वारा जहां. ता.जि.वाशीम येथे छापून कार्यालय, साप्ता. पिंगलाक्षी एक्सप्रेस, सिध्दी विनायक शिक्षक कॉलनी, मु.पो. ता. रिसोड जि. वाशीम (महा.) येथून प्रकाशित केले. (सर्व वाद रिसोड न्यायालया अंतर्गत) प्रकाशित असलेल्या सर्व लेख व वृत्ताशी संपादक सहमत असतीलच असे नाही. (पी.आर.बी. ॲक्ट नुसार संपादक जबाबदार)

# मधुसूदन अग्रवाल ‘कॉनसुलर ऑफ द इयर’ पुरस्काराने सन्मानित

**रिसोड शहर प्रतिनिधी**

**रिसोड : मूळचे रिसोड चे रहिवासी, अजंता फार्माचे सह-संस्थापक आणि उपाध्यक्ष तसेच प्रख्यात समाजसेवक, मधुसूदन अग्रवाल, यांना ऑनरेरी कॉन्सुलर कॉर्प्स डिप्लोमॅटिक-इंडिया तर्फे प्रतिष्ठित ‘कॉनसुलर ऑफ द इयर’ पुरस्काराने २२ मार्च रोजी दिल्ली येथे सन्मानित करण्यात आले. मधुसूदन अग्रवाल हे मुंबईतील युगांडा वाणिज्य दूतावासाचे ऑनरेरी कॉन्सुल (पश्चिम विभाग) म्हणून कार्यरत असून, कळउऊमुंबईचे महासचिव आणि कळ्ट्ट इंडिया चे संचालक देखील आहेत. भारत-युगांडा संबंध बळकट करण्यासाठी त्यांचे विशेष योगदान, सामाजिक कार्य आणि मानवसेवेसाठी केलेल्या उल्लेखनीय प्रयत्नांबद्दल त्यांना हा पुरस्कार प्रदान करण्यात आला. भारतातील विविध देशांचे प्रतिनिधित्व करणाऱ्या २०० हून अधिक ऑनरेरी कॉन्सुल्सपैकी त्यांची निवड करण्यात आली.**




प्रस्तुत प्रतिनिधीशी सन्मानाबद्दल आनंद व्यक्त करताना अग्रवाल म्हणाले : HCCD कडून मिळालेला हा प्रतिष्ठित पुरस्कार माझ्यासाठी अत्यंत गौरवाची बाब आहे. हा सन्मान केवळ माझा नसून, माझ्या कुटुंबाचा, अजंता फार्मातील माझ्या सहकाऱ्यांचा तसेच ‘ममता आणि मधुसूदन अग्रवाल फाउंडेशन’च्या माझ्या टीमचा आहे, जी समाजाच्या कल्याणासाठी अविरत मेहनत घेत आहे. युगांडाच्या सरकारचे आणि तेथील जनतेचे मी मनःपूर्वक आभार मानतो, ज्यांनी मला त्यांची सेवा करण्याची संधी दिली. ते पुढे म्हणाले, या पुरस्कारामुळे माझी जबाबदारी वाढली आहे. मी माझ्या आरोग्य सेवांशी संबंधित उपक्रमांना आणखी व्यापक करण्यासाठी कटिबद्ध आहे, भारत-युगांडा संबंध अधिक दृढ करण्यासाठी प्रयत्नशील राहीन आणि एक निरोगी, समृद्ध समाज घडविण्यासाठी माझे योगदान देत राहीन. भारत ’वसुधैव कुटुंबकम्’ या तत्त्वावर विश्वास ठेवतोह्लसंपूर्ण विश्व हे एक कुटुंब आहे, आणि मीही हाच विचार ठेवून समाजसेवा करत राहीन. मधुसूदन अग्रवाल भारत आणि युगांडामध्ये कर्करोग जनजागृती आणि उपचार क्षेत्रात अग्रेसर आहेत.

अग्रवाल यांनी युगांडा कॅन्सर इन्स्टिट्यूटला ‘होप एक्सप्रेस’ मॅमोग्राफी व्हॅन प्रदान केली, जी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या २०१८ मधील युगांडा दौर्यादरम्यान अधिकृतपणे हस्तांतरित करण्यात आली. मोबाईल कॅन्सर तपासणी केंद्र आजपर्यंत ३००,००० हून अधिक महिलांना तपासणी सुविधा पुरवत आहे, ज्यामुळे १,५०० हून अधिक महिलांचे प्राण वाचविण्यात आले. अग्रवाल यांनी युगांडातील १०० हून अधिक बालकांना भारतात आणून त्यांचे मोफत हृदय शस्त्रक्रिया करून जीवदान दिले आहे.

हा उपक्रम भविष्यातही सुरू असणार आहे. युगांडामध्ये त्यांनी अपंगांसाठी कृत्रिम पाय बसविण्याचा उपक्रम हाती घेतला असून, १,००० कृत्रिम पाय देण्याचे उद्दिष्ट ठेवले आहे. हे उपकरण भू-स्फोटक आणि अपघातग्रस्तांना सक्षम जीवन जगण्यास मदत करणार आहे. भारतात, त्यांनी मुंबईतील संजीवनी ममता हॉस्पिटल (ममता आणि मधुसूदन अग्रवाल फाउंडेशनच्या अंतर्गत) स्थापन करून, तिथे मोफत कॅन्सर तपासणी शिबिरे आयोजित केली आहेत.

यामुळे स्तन आणि गर्भाशय ग्रीवा कर्करोगाचे लवकर निदान होऊन सुलभ उपचार मिळत आहेत. त्यांचे स्वप्न स्पष्ट आहे कोणत्याही आर्थिक अडचणींमुळे कोणीही आरोग्यसेवेपासून वंचित राहू नये.

अग्रवाल यांनी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या ‘आयुष्मान भारत योजने’च्या माध्यमातून भारतात आरोग्यसेवेच्या झालेल्या क्रांतिकारी बदलांचे कौतुक केले.
या योजनेमुळे ६.८ दशलक्ष (६८ लाख) कर्करोग रुग्णांना मोफत उपचार मिळाले आहेत. द लॅन्सेटच्या अहवालानुसार, ३६% कर्करोग रुग्णांचे लवकर निदान होऊन त्यांचे जीवन वाचवले गेले आहे. पंतप्रधान मोदी यांच्या नेतृत्वाखाली भारताने जागतिक स्तरावर उत्कृष्ट आरोग्य सेवा प्रदान करणारा देश म्हणून ओळख मिळवली आहे. त्यांच्या ‘विकसित भारत २०४७’ या दृष्टीकोनाने प्रेरित होऊन मीही समाजसेवेच्या कार्यात सतत पुढे राहीन, असे अग्रवाल यांनी सांगितले.

मधुसूदन अग्रवाल यांना उद्योग, राजनय आणि समाजसेवा क्षेत्रातील त्यांच्या योगदानाबद्दल अनेक प्रतिष्ठित पुरस्कार मिळाले आहेत या पैकी गोल्डन ज्युबिली मेडल - युगांडाचे राष्ट्राध्यक्ष कऱ्‍ योवेरी मुसेवेनी यांनी प्रदान केलेला सर्वोच्च नागरी सन्मान ABLF बिझनेस इनोव्हेटर अवॉर्ड - (Asian Business Leadership Forum, दुबई) UAE चे मंत्री H.H. शेख नाहयान मबारक अल नाहयान यांच्या हस्ते प्रदान झाला.

सेवा भूषण सन्मान - उत्तराखंडचे राज्यपाल यांच्याकडून प्रदान, आयकॉन्स ऑफ औरंगाबाद अवॉर्ड - श्री रतन टाटा यांच्याकडून मान्यता

मधुसूदन अग्रवाल हे आरोग्यसेवा, समाजसेवा आणि राजनय क्षेत्रात कार्यरत राहून समाजावर सकारात्मक प्रभाव पाडण्यास कटिबद्ध आहेत. आरोग्यमुक्त रिसोड हे त्यांचे स्वप्न असून त्याकरिता ते प्रयत्नशील आहेत. रिसोडकर यांना त्यांचा सार्थ अभिमान असून त्यांचे या सन्मानाबद्दल सर्वत्र कौतुक होत आहे.

# एकाच दिवशी 1 हजारावर प्रकरणांचा निपटारा

## ▶▶ राष्ट्रीय लोक अदालतीमध्ये यशस्वी तडजोड ▶▶ ६ कोटी रकमेचे प्रकरणे निकाली




**जिल्हा न्यायालयात आयोजीत करण्यात आलेल्या राष्ट्रीय लोक अदालतीच्या निमित्ताने आपल्या प्रकरणाचा निपटारा होईल या उद्देशाने शेकडो पक्षाकारांची न्यायालयात उपस्थिती होती. या लोक अदालतीला आलेल्या पक्षाकारांसाठी बेसन पोळीची व्यवस्था करण्यात आली होती. प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधिश एस.व्ही. हांडे यांच्या हस्ते बेसन पोळीचे वाटप सुरु करण्यात आले. यावेळी जिल्हा न्यायाधिश, न्यायालयीन कर्मचारी, जिल्हा विधीज्ञ मंडळाचे उपाध्यक्ष ॲड. तिफणे, जेष्ठ विधीज्ञ ॲड. प्रकाश बगडीया व पोलिस कर्मचारी उपस्थित होते. गत चार लोकअदालतीपासून हा उपक्रम सुरु असल्याचे यावेळी ॲड. प्रकाश बगडीया यांनी सांगितले.**

**वाशिम :** राष्ट्रीय विधी सेवा प्राधिकरण दिल्ली, महाराष्ट्र राज्य विधी सेवा प्राधिकरण मुंबई यांनी दिलेल्या निर्देशानुसार शनिवार २२ मार्च २०२५रोजी जिल्ह्यातील सर्व तालुका तसेच जिल्हा न्यायालयामध्ये राष्ट्रीय लोक अदालतीचे आयोजन करण्यात आले होते.

जिल्हा विधि सेवा प्राधिकरणचे अध्यक्ष तथा प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीशवाशिमएस. व्ही. हांडे, जिल्हा विधी सेवा प्राधिकरण वाशिमचे सचिव विजय टेकवाणी यांनी ज्या पक्षकारांचे प्रकरणे न्यायालयात प्रलंबित आहेत तसेच दाखल पुर्व प्रकरणे असलेल्या पक्षकारांनी आपले वाद सामोपचाराने कायमचे मिटविण्याकरीता लोक न्यायालयामध्ये सहभागी व्हावे असे आवाहन केले होते.

राष्ट्रीय लोक अदालतीमध्ये एका दिवसात वाशिम जिल्हयामध्ये न्यायालयात प्रलंबित असलेल्या ४ हजार ८०४ तसेच दाखल पूर्व प्रकरणे ८ हजार ९८ प्रकरणांपैकी प्रलंबित असलेल्या एकुण ७९३ प्रकरणांचा तसेच दाखल पुर्व २१६ असे एकुण १ हजार ९प्रकरणांचा निपटारा करण्यात आला.

या लोक अदालतमध्ये एकुण प्रकरणे रुपये ६ कोटी १२ लाख १८ हजार १९ रकमेचे प्रकरणे निकाली निघालीत. तसेच लोक अदालतमुळे कौटुंबीक वादासंबंधीत प्रकरणांत कुटुंबे एकत्र येवुन नांदण्याकरीता सोबत गेले. राष्ट्रीय लोक अदालत यशस्वी होण्यामध्ये वकील संघाचे व जिल्हा पोलीस दलाचे देखील मोलाचे सहकार्य मिळाले असल्याचे जिल्हा विधी सेवा प्राधिकरणाने कळविले आहे.

# पोस्ट ऑफीसमध्ये विशेष अपघाती विमा मोहिम : २५ व २६ मार्चला संधी

वाशिम - टपाल विभागाच्या वतीने माफक दरात जनरल इन्शुरन्स / अपघाती विमा सेवा उपलब्ध करून देण्यात येत आहे. याअंतर्गत रु. ५४९/- मध्ये १० लाखांचा विमा आणि रु. ७४९/- मध्ये १५ लाखांपर्यंतचा विमा दिला जातो. या योजनेत ओपीडी खर्च, मुलांच्या शिक्षणाचा खर्च, कायमस्वरूपी अपंगत्व आल्यास आर्थिक मदत, टेली समुपदेशन यांसारख्या सुविधा आहेत.

नागरिकांना या सुविधेचा लाभ मिळावा यासाठी मंगळवार आणि बुधवार, २५ व २६ मार्च २०२५ रोजी विशेष मोहिमेचे आयोजन करण्यात आले आहे. नागपूर क्षेत्रीय कार्यालयाच्या निर्देशानुसार ही मोहिम राबवली जात आहे. वाशिम जिल्ह्यातील सर्व शहरी व ग्रामीण पोस्ट ऑफिसमध्ये ही सेवा उपलब्ध आहे. विमा मिळवण्यासाठी फक्त आधार क्रमांक आवश्यक असून, तो मोबाईल नंबरशी जोडलेला असावा. जिल्ह्यातील नागरिकांना आवाहन केले आहे की, टपाल विभाग व इंडिया पोस्ट पेमेंट बँकेच्या माध्यमातून विमा घेत आपल्या कुटुंबाच्या आर्थिक सुरक्षेची खात्री करावी.
अधिक माहितीसाठी जवळच्या पोस्ट ऑफिसशी संपर्क साधावा. असे अकोला विभागाचे प्रवर अधीक्षक सी.व्ही. रामीरेड्डी यांनी कळविले आहे.

# शंभर दिवसांच्या कार्यक्रमांमध्ये जलतारा योजनेसंदर्भात गावांना भेटी

## आसेगाव पेन, कोयाळी येथे कार्यशाळेतून मार्गदर्शन

**रिसोड, दि. २२ (प्रतिनिधी)**

तालुक्यातील आसेगाव पेन,कोयाळी येथे जलतारा योजना राबविण्याचे कामाला प्रारंभ झाला आहे. दरम्यान शासनाच्या शंभर दिवसाच्या कार्यक्रमांमध्ये जलतारा योजनेच्या संदर्भात गावांना भेटी देणे, मार्गदर्शन करणे व त्या बाबी प्रत्यक्षात अंमलात आणण्यासाठी आसेगाव पेन, कोयाळी येथील ग्रामपंचायतला उपविभागीय अधिकारी वैशाली देवकर यांनी भेट देऊन मार्गदर्शन करण्यात आले. यावेळी सरपंच मनिषा खानझोडे यांनी उपविभागीय अधिकारी वैशाली देवकर यांचे स्वागत केले. प्रमुख अतिथी नारायण आरु यांचे स्वागत संतोष खानझोडे यांनी केले.

यावेळी मार्गदर्शन करताना उपविभागीय अधिकारी यांनी सांगितले की, आपल्या गावातील संपूर्ण शेतकरी यांनी जलतारा योजनेची अंमलबजावणी केली. तर, सर्व गाव पाणीदार होईल. आपल्याला पाणी टंचाई पडणार नाही.आपल्या शेतीलाही १२ महिने पुरेल एवढा पाणीसाठा भुगर्भात राहील. जर आपण पावसाचे पाणी वाहुन जाऊ दिले नाही तर, ते पाणी जमीनीत मुरवले तरच पाणीसाठा



जास्त होईल. यासाठी सर्व शेतकऱ्यांनी जलतारा योजनेच्या अंमलबजावणीसाठी प्रयत्न करावे व अल्पभुधारक शेतकऱ्यांनी लाभ घ्यावा व जास्त जमीन धारकांनी ही योजना आपल्या शेतात योजनेतंर्गत काम स्वयंस्फुर्तीने करावे, त्यामुळे संपूर्ण गाव भविष्यातील पिढीसाठी प्रेरणादायी ठरेल व केव्हाच दुष्काळ पडणार नाही. याची काळजी घेण्यासाठी सदर योजनेत सर्वांनी सहभागी व्हावे,असे आवाहन उपविभागीय अधिकारी वैशाली देवकर यांनी केले. दरम्यान गावातील अंगणवाडी शाळेत भेटी दिल्या व जिल्हा परिषद शाळेत सुद्धा भेट देऊन गावातील छत्रपती शिवाजी महाराजांच्या पुतळ्याचे काम प्रगतीपथावर असल्याचे त्यांनी पाहणी दरम्यान सांगितले व छत्रपती हे आपले प्रेरणादायी आहेत.आणि सर्व कामाचा आढावा घेतला.

कार्यक्रमाला मंडळ अधिकारी पडवे, तलाठी कव्हर, तलाठी दुबे, कृषी सहाय्यक अनिल इंगोले, हनुमान आरु, ग्रामपंचायत अधिकारी दिलीप ठोकळ, गावच्या सरपंचा मनीषा खानझोडे, उपसरपंच अनिता कैलास खानझोडे, देविदास खानझोडे, देविदास थोरात, गंगुबाई खंडारे, किरण खानझोडे, लताबाई थोरात, वनमाला खानझोडे, विष्णु शिंदे, शशिकला इंगळे, मधुकर रेखे, अर्जुनराव खानझोडे, संतोष खानझोडे, रविकांत तिखे, अनिल खानझोडे, वैशाली खानझोडे, मुख्याध्यापक वाघ, केंद्रप्रमुख काकडे, विश्वनाथ खानझोडे, ज्ञानेश्वर काळे, कोतवाल पोहकार उपस्थित होते. आसेगाव पेन येथील शेतकरी विठ्ठल शिंदे व विष्णू चव्हाण यांच्या शेतात जलतारा योजनेचा खड्डा घेतला. कार्यक्रमाचे प्रास्ताविक मधुकर रेखे यांनी केले. विजय खानझोडे यांनी आभार मानले.

## जलजीवन मिशन योजनेस २०२८ पर्यंत मुदतवाढ

मुंबई, दि. २०:- राज्यातील जनतेला पुरेसे व शुद्ध पाणी पिण्यासाठी उपलब्ध हवे यासाठी जल जीवन मिशन योजनेअंतर्गत अनेक योजना राबविल्या जात आहेत या योजनेतील कामांना केंद्र शासनाने २०२८ पर्यंत मुदतवाढ दिली आहे, अशी माहिती पाणी पुरवठा व स्वच्छता मंत्री गुलाबराव पाटील यांनी विधानसभेत सन २०२५-२०२६ च्या अर्थसंकल्पातील पाणी पुरवठा व स्वच्छता विभागाच्या अनुदानाच्या मागण्यांवरील चर्चेला उत्तर देताना सांगितले. या प्रयोगशाळांमध्ये १ लाख ७९ हजार ६५९ नमुन्यांची रासायनिक तपासणी करण्यात आली आहे. विहीर, बोअर या पाण्याच्या स्त्रोतांचे बळकटीकरण करणे आवश्यक आहे.

